# आकाशवाणी पुणे
## प्रादेशिक वृत्त विभाग
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.11.2024** **वार – शनिवार**

---

विधानसभा निवडणुकीत पुणे शहर आणि जिल्ह्यात महायुतीनं वर्चस्व मिळवलं आहे. पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरातल्या 11 पैकी 10 मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. वडगांव शेरीची एक जागा महाविकास आघाडीला मिळाली आहे. जिल्ह्याच्या ग्रामीण भागातही मतदारांनी महायुतीच्या बाजूने कौल असून 10 पैकी 8 जागांवर महायुतीचे उमेदवार निवडून आले आहेत. एक जागा महाविकास आघाडीला मिळाली तर एक जागा अपक्ष उमेदवारानं जिंकली.

संपूर्ण राज्याचं लक्ष लागून राहिलेली बारामतीची जागा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रमुख अजित पवार यांनी मोठ्या मताधिक्यानं जिंकली आहे. त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे युगेंद्र पवार यांचा पराभव केला.

पुणे शहरातल्या कसबा पेठ मतदारसंघात भाजपाचे हेमंत रासने विजयी झाले आहेत. त्यांनी त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी कॉंग्रेसचे रविंद्र धंगेकर यांचा 20 हजारांपेक्षा जास्त मतांनी पराभव केला.

कोथरुड विधानसभा मतदारसंघातून भाजपाचे चंद्रकांत पाटील निवडून आले आहेत. त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार चंद्रकांत मोकाटे यांचा 1 लाखांपेक्षा जास्त मताधिक्यानं पराभव केला.

पर्वती मतदारसंघात भाजपाच्या माधुरी मिसाळ निवडून आल्या आहेत. त्यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षांच्या उमेदवार अश्विनी कदम यांचा मतांनी पराभव केला.

शिवाजीनगर मतदारसंघात भाजपाच्या सिद्धार्थ शिरोळेंनी कॉंग्रेसच्या दत्ता बहिरट यांचा 36 हजार 702 मतांनी पराभव केला.

पुणे कॅन्टोन्मेंट मतदारसंघातून भाजपाचे सुनील कांबळे निवडून आले आहेत. त्यांनी काँग्रेसच्या रमेश बागवेंचा 10 हजार 320 मतांनी पराभव केला.

पिंपरी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अण्णा बनसोडे विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या डॉ. सुलक्षणा धर यांच्यावर 36 हजार 664 मतांनी विजय मिळवला.

चिंचवडमध्ये भाजपाच्या शंकर जगताप यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे राहुल कलाटे यांच्यावर 1 लाखांपेक्षा जास्त मताधिक्यानं विजय मिळवला.

भोसरी मतदारसंघात भाजपाच्या महेश लांडगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार अजित गव्हाणे यांच्यावर 50 हजारपेक्षा जास्त मतांनी विजय मिळवला.

खडकवासला मतदारसंघात भाजपाचे भीमराव तापकीर विजयी झाले असून त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सचिन दोडके यांचा मतांनी पराभव केला.

वडगांव शेरी मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बापूसाहेब पठारे यांनी मतिधक्य मिळवलं. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सुनील टिंगरे

हडपसरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या चेतन तुपे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रशांत जगताप

आंबेगांव मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दिलीप वळसे पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार देवदत्त निकम यांच्यावर दीड हजार मतांनी विजय मिळवला.

दौंड विधानसभा मतदारसंघात भाजपाचे राहुल कुल विजयी झाले आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे रमेश थोरात यांच्यावर 13 हजार 889 मतांनी विजय मिळवला.

जुन्नर मतदारसंघात अपक्ष उमेदवार शरद सोनवणे निवडून आले आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सत्यशील शेरकर यांचा 6664 मतांनी पराभव केला.

पुरंदरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार विजय शिवतारे यांनी काँग्रेसच्या संजय जगताप यांच्यावर 24 हजार 188 मताधिक्यानं विजय मिळवला.

मावळमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार सुनील शेळके 1 लाखांपेक्षा जास्त मतांनी निवडून आले. त्यांनी अपक्ष उमेदवार अण्णा भेगडे यांचा पराभव केला.

इंदापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दत्तात्रय भरणे 20 हजार पेक्षा जास्त मतांनी विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे हर्षवर्धन पाटील यांचा पराभव केला.

शिरुर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्ञानेश्वर काटे विजयी झाले आहेत. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या अशोक पवार यांचा 67 हजारांवर मतांनी पराभव केला.

भोर मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शंकर मांडेकर यांनी काँग्रेसच्या संग्राम थोपटे यांचा 20 हजारांवर मतांनी पराभव केला.

खेड आळंदी मतदारसंघात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार बाबाजी काळे 50 हजारांपेक्षा जास्त मतांनी विजयी झाले. त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या दिलीप मोहीतेंचा पराभव केला.

दरम्यान, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महायुतीवर विश्वास दर्शवणाऱ्या जनतेचे आभार मानले असून या विजयाचं श्रेय कार्यकर्त्यांना दिलं आहे. जनतेच्या अपेक्षा पूर्ण करुन राज्याला प्रगतीपथावर नेण्याला आमचं प्राधान्य राहील असं त्यांनी सांगितलं.

**तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.**